अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचे कार्यालय, ९१
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०० ०३०
दुरध्वनी क्र. २४९२१२१२, २४९२२६१८
E-mail :
addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक १५/०३/२०२४

-: प्रेसनोट :-

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | गुन्हा रजि.नं. १०/२०२४ |
| कलम | ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आलोसेचे नाव व कार्यालय | गणपत केशव पालये लायसन्स निरीक्षक, बृहन्मुंबई महानगरपालिका 'सी' वार्ड, मरीन लाईन पूर्व, मुबई, |
| लाचेची मागणी | रु. १२,०००/- रुपये |
| स्विकारलेली रक्कम | रु. १०,०००/- रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हया संस्कृती ज्वेलर्स शॉप मध्ये अकाऊट ॲन्ड अस्टिटंटचे काम करतात. सदर शॉपचे मालक यांनी तक्रारदार यांना शटर ॲण्ड बोर्ड चे लायसन्स करण्याची जबाबदारी दिली होती.<br><br>त्या अनुषंगाने दिनांक १२/०३/२०२४ रोजी तक्रारदार बृहन्मुंबई महानगर पालिका 'सी' वार्ड येथे शटर ॲण्ड बोर्ड चे लायसन्स मिळण्याबाबतचा अर्ज देण्यासाठी गेल्या असता, सदर लायसन्सचे काम करणारे लोकसेवक यांनी तक्रारदार यांना शटर ॲण्ड बोर्डसाठी लागणारे कागदपत्रे घेवून येण्यास सांगितले, त्याप्रमाणे सर्व कागदपत्रे घेवून तक्रारदार हे लोकसेवक यांना भेटले असता, लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे शटर बोर्डाचे लायसन्स मिळण्याकरीता रु. १२,०००/- इतक्या लाचेच्या रक्कमेची मागणी केली. परंतू यातील तक्रारदार यांना लोकसवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक. १४/०३/२०२४ रोजी लाप्रवि, वरळी कार्यालयास येवून लेखी तक्रार दिली.<br><br>प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १५/०३/२०२४ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक यांनी तडजोडी अंती रू. १०,०००/- इतक्या रक्कमेच्या लाचेची पंचासमक्ष मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार सापळा कारवाई दरम्यान आलोसे यांना लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले. म्हणून त्यांच्या विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

**मार्गदर्शक अधिकारी :–** **श्री. विजय पाटील सो, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग,**
**श्री. राजेंद्र सांगळे सो, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग,**
**श्री. भागवत सोनावणे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग.**

(नितीन दळवी)
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क** - लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सरपोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ३०

**संकेतस्थळ** - acbmaharastra.gov.in

**ईमेल** - १) acbwebmail@mahapolice.gov.in २) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in.

**ऑनलाईन तक्रार अर्ज** -**www.acbmaharastra.net.**

**टोल फि. क्र. १०६४**

**दुरध्वनी क्र.** ०२२ २४९२१२१२ **फॅक्स. क्र.** ०२२२४९२२६१८, **व्हॉटसअप क्र.** ९९३०९९७७००